आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

७ नोव्हेंबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभेच्या प्रचारासाठी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांच्या राज्यात प्रचारसभा, १० नोव्हेंबर रोजी महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध होणार
- विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वचननामा प्रसिद्ध
- भारत निवडणूक आयोगाचे उपायुक्त हिरदेश कुमार यांच्याकडून राज्यात विधानसभा निवडणूक तयारीचा आढावा / निवडणुकीत पारदर्शकता जपण्याचे दिले निर्देश
- सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची माहिती

  **आणि**

- भारतीय शेअर बाजारात कालच्या तेजीनंतर आज पुन्हा घसरण

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी येत्या १३ ते १८ नोव्हेंबर या काळात काँग्रेस नेत्यांच्या प्रचारसभा होणार आहेत. काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला आणि काँग्रेसच्या प्रचार समितीचे अध्यक्ष चंद्रकांत हांडोरे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या प्रचार समितीची बैठक आज झाली, त्यावेळी चेन्नीथला यांनी ही माहिती दिली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, जेष्ठ नेते राहुल गांधी, प्रियांका गांधी, सिद्धरामय्या, रेवंत रेड्‌डी हे नेते या सभांना उपस्थित राहणार असल्याचं चेन्नीथला यांनी या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. वांद्रा कुर्ला संकुलात काल काँग्रेसने लोकसेवेची पंचसूत्री जाहीर केली. महाविकास आघाडीचा जाहिरनामा १० नोव्हेंबरला प्रसिद्ध केला जाईल अशी माहिती देताना चेन्नीथला

यांनी कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसने ज्या गॅरंटी दिल्या त्याची अंमलबजावणी सुरु आहे. गॅरंटी जाहीर करताना आर्थिक तरतूद कशी केली जाईल यावर सखोल चर्चा आणि अभ्यास करुनच त्या जाहीर केल्या आहेत, असंही रमेश चेन्नीथला यांनी सांगितलं. काँग्रेसच्या ज्या उमेदवारांनी महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांविरोधातले अर्ज मागे घेतले नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात आली असून त्यांना ६ वर्षांसाठी काँग्रेसमधून निलंबित करण्यात आले आहे अशी माहिती त्यांनी दिली.

काँग्रेसच्या गॅरंटीविरोधात चुकीच्या आणि अफवा पसरवणाऱ्या खोट्या जाहिराती भाजपाने वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्या आहेत. या विरुद्ध काँग्रेस निवडणुक आयोगाकडे दाद मागणार आहे असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज मुंबई इथून आपला वचननामा प्रसिद्ध केला. पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वांद्रे इथल्या निवासस्थानी या वचननाम्याचं प्रकाशन झालं. संस्कार, अन्नसुरक्षा, महिला, आरोग्य, शिक्षण, पेन्शन, शेतकरी, वंचित समूह, उद्योग तसंच मुंबईच्या विकासासाठी असलेलं धोरण या प्रमुख घटकावर आधारीत हा वचननामा आहे. हा आपल्या पक्षाचा वचननामा असून महाविकास आघाडीचा सविस्तर जाहीरनामा लवकरच जाहीर होईल, असं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. यावेळी ज्येष्ठ नेते सुभाष देसाई, आमदार अनिल परब यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

महाविकास आघाडी उमेदवारांच्या प्रचारासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. दर्यापूर, वलगाव आणि बडनेरा इथं ठाकरे यांच्या जाहीर सभा होणार आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष प्रमुख, खासदार शरद पवार आज विदर्भाच्या दौऱ्यावर असून, आज ते पूर्व नागपूर, गोंदिया जिल्ह्यात तिरोडा आणि काटोल विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारसभांना संबोधित करतील. आज नागपूर इथं आगमन झाल्यावर त्यांनी नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार दुनेश्वर पेठे यांच्या प्रचार सभेला संबोधित केलं. महाराष्ट्रातून उद्योगांचं पलायन झालं असून देशाचे प्रधानमंत्री हे एका राज्याचे, नसून ते सर्व देशाचे असायला हवेत. जातीनिहाय जनगणनेची मागणी आम्ही तीन वर्षांपासून करत असून, त्या माहितीच्या आधारावर आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची स्थिती निर्माण होऊ शकते, असं ते म्हणाले.

गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार रविकांत बोपचे यांच्या प्रचार सभेला, आणि त्यानंतर संध्याकाळी काटोल विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार सलील देशमुख यांच्या सभेला शरद पवार उपस्थित राहतील.

**<><><><><>**

मतदारांपर्यंत मतदानाच्या चिठ्या वेळेवर द्याव्यात. मतदारयादीसंबधिच्या तक्रारींचा तातडीनं निपटारा करावा अशा सूचना भारत निवडणूक आयोगाचे उपायुक्त हिर्देशकुमार यांनी दिल्या ते काल संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती विभागातल्या सर्व जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघांमधील निवडणूक तयारीच्या आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, यांच्यासह सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक काळात पारदर्शकता जपण्याच्या तसचं प्रत्येक टप्प्यावर राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या प्रतिनिधींना माहिती द्यावी. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रयत्न करावे. मतदारांना मतदान करणे सोईचे व सुलभ व्हावे यासाठी उपाययोजना राबवाव्या. मतदानाचे प्रमाण नेमके कळावे व त्यातील आकडेवारीत अधिक अचूकता यावी यासाठी या निवडणूकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीसाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नेमणूक आदी सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीतल्या भाजपा आणि महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी भाजपाचे जेष्ठ नेते आणि केंद्रीय रस्ते तसंच वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आजपासून राज्याच्या दौऱ्यावर आहेत. येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत राज्यात त्यांच्या पन्नास जाहीर सभा होणार आहेत. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजे १६ ते १८ या दिवसातही गडकरींच्या प्रचारसभांचं नियोजन करण्याबाबत प्रदेश भाजपाने सर्व जिल्ह्यांच्या पदाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज अकोला आणि वाशीम जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. गृहमंत्री शहा यांच्या हस्ते आज

नवी दिल्ली इथं दहशतवाद विरोधी परिषदेचं उद्घाटन करण्यात आलं. तीन नव्या फौजदारी कायद्यांमुळं नागरिकांच्या अधिकारांचं रक्षण होत असल्याचं अमित शहा म्हणाले. कर्तव्य निभावत असताना शहीद झालेल्या ३६ हजारांहून अधिक पोलिसांना शहा यांनी श्रद्धांजली अर्पण केली. राष्ट्रीय तपास संस्थेनं या दोन दिवसीय परिषदेचं आयोजन केलं आहे. केंद्रीय तपास संस्थांचे अधिकारी, न्यायवैद्यक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची परिषदेला उपस्थिती आहे.

<><><><><>

शेअर बाजारातल्या कालच्या तेजीला आज लगाम बसला. दुपारच्या सत्रात मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ७९ हजार ५५१ अंकांच्या आसपास, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी, २४ हजार १८९ अंकांच्या आसपास व्यवहार करत आहे.

अमेरिकेतल्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणूक निकालानंतर शेअर बाजारात काल संध्याकाळच्या सत्रात तेजीचा जोर होता, मात्र गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा घेतल्यामुळे आज सकाळच्या सत्रापासून तो ओसरला.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जागृतीसाठी राबवण्यात येणाऱ्या स्वीप कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय संचार ब्यूरो आणि भारत निवडणूक आयोगाच्या वतीनं एक फिरतं प्रदर्शन उद्यापासून सुरु होणार आहे. प्रदर्शन लावलेल्या या गाड्या १५ निवडक जिल्ह्यांमधे मतदानविषयक जनजागृतीचा संदेश घेऊन जाणार आहेत. उद्या मुंबईत सोहळ्यात भारत निवडणूक आयोग तसंच राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे वरीष्ठ अधिकारी, चित्रपट, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातल्या मान्यवरांचा उपस्थितीत मतदार जागृती उपक्रमांचा प्रारंभ होणार आहे. याच कार्यक्रमात या फिरत्या प्रदर्शन वाहनांना हिरवा झेंडा दाखवला जाणार आहे.

<><><><><>

शरद पवारांवर खालच्या पातळीवरची वैयक्तिक टीका राष्ट्रवादी काँग्रेस खपवून घेणार नाही असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाजमाध्यमावर दिला आहे. आमदार सदाभाऊ खोत यांच्या टीप्पणीसंदर्भात हे वक्तव्य चुकीचं आणि अमान्य आहे अशी प्रतिक्रिया देत अजित पवार यांनी त्याचा तीव्र शब्दात निषेध केला आहे.

<><><><><>

महाराष्ट्र आणि झारखंडमधील निवडणुका तसेच पोटनिवडणुकांमध्ये मतदारांना प्रलोभन देण्याची प्रकरणे रोखण्याच्या उद्देशाने अंमलबजावणी यंत्रणांनी केलेल्या कारवाईत आत्तापर्यंत ५५८ कोटी रुपये मूल्यांची रोकड, मोफत वाटपासाठी आणलेल्या प्रलोभनपर वस्तू, मद्य, अंमली पदार्थ तसंच मौल्यवान धातू जप्त केले असल्याची माहिती भारत निवडणूक आयोगानं दिली आहे. निवडणुका जाहीर झाल्यापासून महाराष्ट्रात केलेल्या कारवाई अंतर्गत सुमारे २८० कोटी रुपये, तर झारखंडमधून १५८ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचं आयोगानं कळवलं आहे.

दोन्ही राज्यांमधील यंदाच्या निवडणूक काळातली जप्ती ही २०१९च्या निवडणुक काळाच्या तुलनेत साडेतीन पटीनं जास्त असल्याचंही आयोगानं म्हटलं आहे. यंदाच्या जप्तीत सर्वाधिक चाळीस टक्के प्रमाण हे मोफत वाटपासाठी आणलेल्या प्रलोभनपर वस्तूंचं असल्याचंही आयोगानं म्हटलं आहे.